
॥ न्यू इंग्लंड मराठी मंडळ ॥
NEW ENGLAND MARATHI MANDAL

डिसेंबर २०२३
कार्तिक शके १९४५

# अनुबंध

## यशोगाथा: वाटचाल ध्येयाकडून यशाकडे



|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL



# अनुक्रमणिका


- **संपादकीय**
- **अनुबंध संपादक समिती**
- **अध्यक्षीय मनोगत**
- **कार्यकारिणी समिती**
- **कथा यशोगाथांच्या**
  - एक तरुण उभरता मराठी उद्योजक - विकी जाधव
  - प्रबळ इच्छा शक्तीचा धनी - संतोष साळवी
  - Building Success: Career, Family & Real Estate - संगीता शेरे
  - SKVL: My Journey - प्रतीक्षा मोरे
  - "Unveiling Dreams: A Blessing in Disguise" -प्रिया सामंत
- **इतर कथा**
  - आमची अमेरिकेची वारी - भास्कर पवार
  - गोपी टांगेवाला - भास्कर पवार
- **कविता**
  - श्रीकृष्ण - भास्कर पवार
  - एक प्रेरणादायी चरित्र... - सुनील दौलत खोडके
- **आवाहन (पुढचे लिखाण)**

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

अनुबंध समिती २०२२-२३ च्या दुसऱ्या अंकाचे प्रकाशन करतांना आम्हाला खूप आनंद आहे आणि एक खंत सुध्दा आहे कि हा आमच्या समितीचा शेवटचं अंक असणार आहे.

यावेळेस चा अनुबंध चा विषय "वाटचाल, ध्येयायाकडून यशाकडे", हा खूप प्रेरणादायी आहे. प्रत्येक माणसामध्ये एक काहीतरी करून दाखवण्याची जिद्द असते व त्यासाठी हवी ती मेहनत करण्याची त्याची तयारी असते. ते ध्येय गाठण्याचा प्रयत्न करत असतांनां अनेक अडचणी येतात, पण आपण जिद्दीने त्याचा पाठपुरावा करत असतो. आणि असा संघर्ष करत असतांना जे काही अनुभव येत असतात त्याचं एक जिवंत चित्र या अंकाच्या निमित्ताने आपल्यापुढे ठेवण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे.

अंकाचे मुखपृष्ठ हे ..... यांनी खूप सुंदर रेखाटले आहें. अंकासाठी लागणारी तांत्रिक मदत, प्रूफ रीडिंग, अंक जुळवणी ई. मराठी भाषेची चांगले जाण असणारे अमेय परांजपे आणि अर्चना पानवलकर यांनी पार पाडली आहे तर अंकाची सजावट, बांधणी यासाठी श्रेया जोशी यांनी खूप मेहेनत घेतलेली आहे.

या अंकासाठी ज्यांनी लेख, कविता, चित्रे ई. पाठवली त्या सर्वांचे मनापासून आभार.

आपणा सर्वांना हा अंक नक्की आवडेल अशी अपेक्षा.

धन्यवाद,

सुधीर डोके

**विशेष नोंद-** ह्या विशेषांकात काही साहित्य लेखकांच्या विनंतीवरून इंग्रजी भाषेत दिले आहेत. त्यांची आतापर्यंतची वाटचाल तरुण पिढीला वाचता येईल हा एकच उद्देश त्यामागे आहे.

# अनुबंध संपादक समिती

**संपादक :** सुधीर डोके

**संपादक सहाय्य :** अमेय परांजपे, अर्चना पानवलकर

**मांडणी व सजावट :** अमेय परांजपे

**मुखपृष्ठ :** ज्योती जोशी


|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

अनुबंध मासिकात जाहिरात करण्यासाठी कृपया संपर्क करा:

registration@nemm.org


***लेखांत व्यक्त झालेली मते ही पूर्णपणे संबंधित लेखकांची आहेत. न्यू इंग्लंड महाराष्ट्र मंडळ तसेच संपादक समिती त्यांच्याशी सहमत असेलच असे नाही.
***अंकासाठी सर्व काळजी घेतली गेली असली तरी छपाईत किंवा अन्य इतरत्र काही चूक भूल झाली असल्यास उदार मनाने ती नजरेआड कराल अशी आशा आहे.

***अनुबंध मासिकामध्ये सुशोभीकरणासाठी वापरण्यात आलेली चित्रे ही माहिती अंतर्जालातून घेण्यात आलेली आहेत. त्यांचे मालकी हक्क संबंधित मालकांकडे असून न्यू इंग्लंड महाराष्ट्र मंडळाकडे नाहीत.

# अध्यक्षीय मनोगत

स्वाती शिंदे, अध्यक्ष NEMM (२०२२-२३)



"If you are working on something very exciting that you really care about, you don't have to be pushed. THE VISION PULLS YOU."

-- Steve Jobs

नमस्कार मंडळी,

खरंच गेली दोन वर्ष मंडळाच्या कामात अगदी झोकून काम करूनही वेळ कसा गेला हे कळलंच नाही आणी त्यातूनच मला स्टिव्ह जॉब्स ने केलेल्या वरील विधानाची वैयक्तिक अनुभूती झाली . ह्या विधानाचा आणि ह्या वेळेच्या आपल्या अनुबंध अंकाच्या शीर्षकाचा (यशोगाथा:वाटचाल,ध्येयाकडून यशाकडे) खूप जवळचा संबंध आहे असे मला वाटते. ह्या अंकाद्वारे अनेक व्यक्तींनी आपल्या यशामागील खडतर प्रवासाची जी माहिती दिली आहे त्यामधील एक सामान दुवा सापडतो तो म्हणजे ह्या प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या ध्येयाच्या आकर्षणातुन मिळणारी ऊर्जा. हि ऊर्जाच कारणीभूत असते प्रत्येकाला आपल्या अडचणींवर मात करून पुढे जाण्याचं साहस देण्यासाठी. दर्जेदार कार्यक्रम आयोजीत करुन, आपल्या समुदायातील लोकांचा सहभाग सतत वाढवत मंडळाची सर्वांगीण वाढ व्हावी हे ध्येय समोर ठेऊन माझ्या समीतीने मंडळाच्या कामांची सुत्र हाती घेतली. गेल्या दोन वर्षात झालेले जवळजवळ २० कार्यक्रम आयोजित करताना आलेल्या असंख्य आव्हानांना सामोरं जाण्याची शक्ती दिली तीही ह्याच ध्येयार्जीत ऊर्जेने. २०२२ चे आमचे पहिले वर्ष यशस्वी कार्यक्रमाच्या जोरावर पार पडले आणि म्हणूनच २०२३ सुरु होताना नवीन वर्षाच्या आमच्या संदेशात आम्ही आश्वासन दिल होत कि ज्या जोशाने आम्ही २०२२ चे कार्यक्रम केले त्याहि पेक्षा दुप्पट जोशात आम्ही २०२३ चे कार्यक्रम घेऊन येऊ. तुमची भरघोस दाद मिळवत मंडळाची सदस्यसंख्या जवळजवळ दुप्पट झालेली पाहताना आम्ही हे आश्वासन नक्कीच पाळलं आहे असं म्हणण्यास मी संकोचणार नाही.

कार्यक्रमांच नियोजन करताना मराठी संस्कृतीचा वारसा जपत स्थानिक कलाकारांना वाव देणं आणि त्याचबरोबर व्यवसायिक कलाकारांचा सहभाग असलेलं दर्जेदार मनोरंजक कार्यक्रम आयोजित

करणे ह्यावर आम्ही लक्ष केंद्रित केलं . आमच्या दुसऱ्या वर्षाची सुरुवात झाली ती मकरसंक्रातीच्या कार्यक्रमाने ज्यामध्ये आपल्या समुदयातील प्रतिभावान गायक आणी वादकांनी सुमधुर गाण्यांची मेहफील सजवली. त्यानंतर गुढीपाडव्यानिमित्त आपल्या स्थानिक कलावंतांनी उत्कृष्ट नाटक सादर करून नाटकवेड्या मराठी रसिकांची मने जिंकली. नवीन उपक्रम सादर करून नव्या लोकांना मंडळात सामावून करण्याच्या उद्देशाने पुरुष आणि महिला "NEMM क्रिकेट लीग " सुरु केली ज्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. आपल्या समुदायातील लोकांच्या कलागुणांवर आधारित कार्यक्रम करता करता मनोरंजनाचा उत्तुंग बिंदू गाठला ते महाराष्ट्र दिनानिमित्त Dazzling महाराष्ट्र , उन्हाळी सुट्टीत महाराष्ट्राची हास्य जत्रा आणि दिवाळीनिमित्त नाट्योत्सव हे उत्तम कार्यक्रम सादर करून.

प्रत्येक समितीचं सर्वात मोठं आव्हान असतं ते म्हंणजे गणपतीनिमित्त होणारा कम्युनिटी प्रोग्राम. वैयक्तिकदृष्ट्या ह्यावेळेचा कम्युनिटी प्रोग्राम माझ्या प्रचंड जवळीचा होता. कित्येक महिन्यापासून एक विषय मनात होता . मराठी चित्रपटसृष्टीचे चार धुरंदर विनोदी तारे अशोक सराफ, लक्ष्मीकांत बेर्डे , महेश कोठारे आणि सचिन पिळगावकर ह्याच्या चित्रपटातील गाणी , नृत्ये आणि काही विनोदी प्रसंग एका अवॉर्ड्स शो च्या माध्यमातून सादर करावी अशी कल्पना मनात होती .कल्पनेचा विस्तार करून त्याला शीर्षक दिले "NEMM Awards Night : हास्याचे शिलेदार ". सहभागासाठी केलेल्या निमंत्रणाला जवळजवळ १५० कलाकारांनी विक्रमी प्रतिसाद दिला. बाकीचे कार्यक्रम करता करता हास्याचे शिलेदार कार्यक्रमाची तयारी एवढ्या मोठ्या संख्येने भाग घेणाऱ्या कलाकारांबरोबर करणे म्हणजे तारेवरची कसरत होती परंतु माझ्या टीमच्या भक्कम पाठिंब्याने आणि कलाकारांच्या उत्साहाने आलेल्या अडचणींवर मात करण्याची शक्ती मिळाली . ७२५ क्षमता असलेला लिटिल्टन हाय स्कुलचा सभागृह हॉउसफुल्ल झाल्येने मंडळाच्या इतिहासात सर्वप्रथम कार्यक्रमाच्या चार दिवस आधी नोंदणी बंद करावी लागली . तीन तास चाललेला हा कार्यक्रम प्रचंड यशस्वी झाला आणि मनाला आजन्म स्मरणात राहील असा एक तृप्ततेचा भाव मनात रुजवून गेला .

गणपतीच्या कार्यक्रमाच्या तयारीचा क्षीण अजून उतरला नव्हता तरी मनाने पुन्हा भारी मारली कारण लहानपणी खेळलेल्या जागरणाच्या पारंपारिक खेळांच्या पुसटश्या आठवणीनि मनाच्या कोनाड्यात कुठेतरी घर केलं होत. त्यातून जन्म झाला "NEMM जल्लोष : उत्सव पारंपारीक खेळांचा " . खास स्त्रियांसाठी झीम्मा फुगडी ,भोंडला हे खेळ आयोजित करताना मनाची सर्व हौस फेडून घेतली. ७०+ स्त्रियांनी भाग घेऊन कार्यक्रम खूप यशस्वी केला.

गेल्या दोन वर्षात आम्ही अनेक कल्पना राबवल्या.

- नावीन्यपूर्वक आणि आक्रमक मार्केटिंग ( ४०+ रिल्स , २००+ इमेल्स , फेसबुक/इन्स्टा /युट्युब पोस्ट )
- स्थानिक आणि व्यवसायिक कार्यक्रमाचा समतोल (५ स्थानिक आणि ५ व्यावसायिक )
- फोकस गटावर आधिरीत अतिरिक्त कार्यक्रम (क्रिकेट , जोश ढोल ताशा , सिनेमा , गृहसम्राज्ञी , जल्लोष, महाराष्ट्राची हास्यजत्रा )

- प्रयोजकांवर भर
- वोल्युनटिअर प्रोत्साहन आणि सहभाग
- कलात्मकता ( गणपती डेकोरेशन , फोटो बूथ , ड्रेस थिम )


आम्ही राबविलेल्या कल्पनांच्या प्रभावामुळे मिळालेल्या काही उपलब्धी आवर्जून नमूद कराव्याशा वाटतात .

- मंडळाच्या सभासदसंख्येमध्ये दुप्पट वाढ
- विक्रमी निधी उभारणी
- २५०+ स्थानिक कलाकरांचा सहभाग
- ढोल ताशा लेझीम साठी १२०+ लोकांचा सहभाग
- १००+ क्रिकेट खेळाडूंचा सहभाग
- १००+ वोल्युनटिअर सहभाग
- १००+ कॉलेज विद्यार्थीनि विनामूल्य /सवलतीच्या दरात कार्यक्रमांचा लाभ घेतला

मंडळाचे परंपरागत वार्षिक फक्त ६ कार्यक्रमाव्यतिरिक्त आणखींचे कार्यक्रम करता करता दोन वर्षांनंतर ह्या सर्व कार्यक्रमांचा एकूण आकडा २० पर्यंत कधी गेला हे कळलेच नाही . मार्च २०२३ ला माझी टीम एकामागोमाग एक येणाऱ्या ५ कार्यक्रमाची तयारी एकाच वेळी करत होती . आमचा प्रत्येक टीम मेंबर स्वतःचा नोकरी/व्यवसाय सांभाळत हि सर्व काम करत होता. आमच्या कार्यकाळाच्या शेवटी आम्हाला जे यश मिळाले त्या यशाचं कारण म्हणजे आमच्या टीमने समोर ठेवलेला मंडळाच्या सर्वांगीण वाढीच ध्येय आणि आपल्या समुदायाच्या हितासाठी काम करण्याची असलेला आमच्या टीमचा उत्साह. Mr Steve Jobs , You Are So Right !

# कार्यकारणी समिती (२०२२-२३)


स्वाती शिंदे


स्मिता लाटे


रवी रासने


सुधीर डोके


अंकुश आठले



श्रेया जोशी


बकुल कानडे


अदिती मांजरेकर


अर्चना पानवलकर


लीना परब


अमेय परांजपे


वृषाली फिरके


सुप्रित पाटणकर


मिलिंद रानडे


श्वेता साळवी


स्वप्नील शिंदे


सचिन येवला

# कथा यशोगाथांच्या

## एक तरुण उभरता मराठी उद्योजक

- विकी जाधव



विकी जाधव , एक तरुण उभारता मराठी उद्योजक

मिळणं म्हणजे "यश" नाही...

मिळणं म्हणजे ते यश मिळण्याचा "प्रवास" ...!!!

नाशिक या ओझर गावा मध्ये जन्मलेला एक तुमच्या-आमच्या सारखा सवर्सामान्य मुलगा. मध्यम वर्गीय सुशिक्षित कुटूंब जिथे आजोबा मुख्याध्यापक, वडील इंजिनीअर या मुळे विकी ने सुद्धा इंजिनअर व्हावं हा

एकंदरीत कल. परंतु विकी ची आवड हि घरातील स्वयंपाक घरातील विविध पदार्थांमध्ये अडकलेली. मोठा भाऊ इंजिनीअर, लहान बहीण इंजिनीरिंग चे शिक्षण घेत असताना विकी ने मात्र इलेक्ट्रिकल इंजिनीरिंग डिप्लोमा मधून माघार घेत काहीतरी वेगळाच मार्ग निवडला.

हॉटेल मानजमेंट चा डीप्लोमा २०१२ ला पूर्ण करून वयाच्या १७ व्या वर्षी रामोजी फिल्म सिटी मध्ये शेफ म्हणून नोकरी मिळवली.

परंतु विकी मधील चुणूक आणि योग्यता ओळखून तिथल्या हेड शेफ ने पुढील शिक्षण घेण्याचा सल्ला दिला. त्यानुसार तसेच घरच्यांना दुजोरा दिल्याने विकी ने आय. एच. एम. (इन्स्टिटयूट ऑफ हॉटेल मानजमेंट अहमदाबाद) मधून बॅचलवर्स इन हॉटेल मानजमेंट ची डिग्री पूर्ण केली.

कॉलेज मधून प्लेसमेंट मार्फत आय. टी. सी. ग्रँड मराठा ची जॉब ऑफर पदरात घेत विकी ने आपल्या करीरची सुरुवात केली.लगेच काही महिन्यात हायत दिल्ली आणि मुंबई मध्ये सुद्धा काम करण्याची संधी मिळाली. काम करत असतांना तिथेच न थांबता आता इंटरनॅशनल संधी चा विचार करू लागला होता.नशिबाने हि त्याला साथ देत मॅरीयॉट इंटरनॅशनल मध्ये काम करण्याची ऑफर मिळाली.

विकी चा USA चा प्रवास सौथ कॅरोलिना मधून सुरु झाला. एक शेफ म्हणून काम करत असतांना, अधिक शिकण्याची जिद्द अजून बाकीचं होती.

मॅरीयॉट मध्ये काम करत असतांना त्याने हॉस्पिटॅलिटी मानजमेंट मधील कोर्सेस शोधण्यास

सुरुवात केली आणि न्यू-यॉर्क युनिव्हर्सिटी चा बिजनेस मॅनेजमेंट इन प्रोफेशनल स्टडीस पूर्ण केला. त्या नंतर मॅरीयॉट NYC मध्ये काम करू लागला. ह्या कोवीड च्या काळात त्याने NYC मधील हॉस्पिटल्स ला मॅरीयॉट मार्फत जेवण पुरवण्याचं महत्वाचं काम केलं.ह्या मध्ये तो जेवण बनवण्यापासून ते पोहोचवणे, सर्व करणे हे सगळं तो स्वतःहून पाहत होता.

२०२० च्या पूर्वार्धात विकी बोस्टन मॅरीयॉट मध्ये आला आणि इथूनच पुढे त्याच्यातील उद्योजक कलागुणांना वाव मिळू लागला. मॅरीयॉट मध्ये असतांना तो बोस्टन मधील इंडियन फाईन डाईंन मध्ये पार्ट टाइम नोकरी करू लागला.इथेच त्याची गाठ ट्रेजरी चे मालक श्री देवेंद्र पाटील ह्यांच्याशी पडली. एक मराठी माणूस ह्या क्षेत्रामध्ये पाहून विकीचा आत्मविश्वास वाढला आणि एका नवीन प्रवासाला सुरुवात झाली.

२०२१ च्या मध्यास त्याच्याकडे होनेस्ट रेस्टॉरंट ची नवीन ब्रांच सेटअप करण्याची मदतीची संधी चालून आली.मॅरीयॉट, होनेस्ट, आणि ट्रेजरी मध्ये काम करत असतांना तो अनेक उद्योजकांच्या संपर्कात आला. त्याच्या कामातील कौशल्य, कुशलता, अनुभव, आणि एकूणच दृष्टिकोन अनेकांनी अचूक हेरला. त्याच वेळी त्याच्याकडे अमेरिकन फूड चैन "सोनिक ड्राईव्ह इन" ची स्टोटोन ब्रांच पुनर स्थाक्षपित करण्याची नामी संधी चालून आली. त्यासाठी हि एक चांगली संधी तर होतीच पण रिस्क सुद्धा जास्त होती. आज वर जमा केलेली सर्व पुंजी पणाला लावत विकीने नोकरी च्या ऐवजी मालक (भागीदार) म्हणून ह्या संधी मध्ये उडी घेतली. उद्योजक म्हणून त्याच्यासाठी हा पहिलाच प्रवास होता.

सहा महिन्यात अथक प्रयत्नांनी त्याने सोनिक मध्ये डाईंन इन ची नवीन संकल्पना आणली. साधारण एका वर्षात सोनिक चा धंधा पुन्हा भरभराटीस आला आणि विकरीचे नवीन उचांक गाठले.

सोनिक च्या अनुभवानंतर त्याने मित्रांसोबत अटलांटा मध्ये एक मेक्सिकन रेस्टॉरंट विकत घेऊन ते आज यशस्वी पाने चालू आहे.विकी ने बोस्टन आणि आजू बाजूच्या उपनगरातील एक मराठी केटरिंग ची कमतरता अचूक पाने हेरली. १५ ऑगस्ट २०२३ च्या FIA परेड चे औचित्य साधून आपल्या जवळच्या मराठी मित्रांना सोबत घेऊन विकी ने VSS (विकी,सिद्धेश, सचिन) कॅटरिंग चालू केली. VSS कॅटरिंग ला बोस्टन मधील मराठी तसेच भारतीय परिवारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. २०२३ च्या सणासुदीच्या काळात VSS ने अनेक मोठ्या इव्हेंट्सला कॅटरिंग केली तसेच, शेकडो छोटे-घरघुती ऑर्डर्स स्वीकारले. आज त्यांची यशस्वीरीतीया घौडदौड सुरु आहे.

सध्या विकी बोस्टन मध्ये एक फाईन डाईंन स्पोर्ट्स क्लब बार लाँच करत आहे जो लवकरच तुमच्या सेवेसाठी तयार असेल आणि एक नवीन भारतीय फाईन डाईंन रेस्टॉरंट सुद्धा तुमच्या सेवेत आणण्याचा प्रयत्न आहे.

# प्रबळ इच्छा शक्तीचा धनी (संतोष साळवी)

- लेखक (ब्रजेश चिखराम)



वस्तुस्थिती ही कल्पनेपेक्षा वेगळी असते हे जरी खरं असेल, तरी कल्पना ही स्वप्नांची पहिली पायरी असते आणि नंतर तेच स्वप्न माणसाच्या मनात रुजतात आणि स्वप्नांची ओहोड ध्येयाला डोळस बनवते.

संतोष साळवी यांची गोष्ट त्यांच्या स्वप्नांची, प्रबळ इच्छाशक्तीची आणि सातत्याची आहे, अर्थातच त्यांचे चांगले व्यक्तिमत्व आणि मूल्य त्यांना हा उच्चांक गाठण्यास मदत करते. पण म्हणतात ना पलटुनी खाली बघता; सुखद वाटतो प्रवास ह्या उंचीचा.

संतोष साळवी यांचा जन्म रत्नागिरी मध्ये झाला, सुरुवातीचे बालपण हे मुंबईतल्या चाळ संघर्षात आणि नंतर वडिलांच्या नोकरीमुळे एलआयसी च्या श्रमसाफल्य कॉलनीत गेलं. सामाजिक तबक्यात आणि सांस्कृतिक संमेलनात ते आवर्जून भाग घ्यायचे आणि तिथे त्यांचे सूत्रसंचालन त्यांच्या नेतृत्व गुणवत्येची ग्वाहि देतही असेलं, पण गणा जणांच्या मदतीस जाणं हे संस्कार त्यांच्या आईंनी त्यांच्यावर घडविले. घरात लहापणी नातेवाईकांची येजा असायची आणि आई शिक्षक असल्यामुळे त्यांचा स्वयंपाक करून बोरिवली ते भाईकला शाळेत शिकवायला जाईची. परिवार, नातेवाईक आणि समाज या क्रमाने माणसाने सामाजिक कार्य करावं असं आईचं ठाम मत असायचं.

त्याच काळात कॉम्पुटर च्या चमत्काराने जगाला वेड लावलं होत, आणि कॉम्पुटर बद्दल वार्ता शाळे-शाळेत पसरत होत्या, आणि त्याचमुळे कॉम्पुटर जगतात कॅरियर करायचं आहे ह्याची संतोषला ओढ लागली. ओढ दृढ निश्चयात बदलली; पण समोर मोठ तप होत. बारावीनंतर काही आर्थिक कारणांमुळे त्यांना इंजिनीअरिंगला प्रवेश मिळू शकला नाही, म्हणून त्यांनी बीएस्सी कॉम्प्युटर केलं. नंतर, त्यांना महेंद्रमध्ये टायपिस्टची नोकरी मिळाली, पण मंशा प्रोग्रामर बनायची म्हणून कंपनीत सहकार्यांना प्रोग्रामिंग-कोडिंग मध्ये मदत करू लागले. आणि मग सुरु झाला त्यांचा प्रवास प्रोग्रामर म्हणून मुकुंद कंपनी मध्ये, अर्थातच एक गोष्ट होती जी त्यांना वेगळं करत होती; ती म्हणजे त्यांची प्रबळ इच्छा शक्ती. त्यांना येणाऱ्या काळाची कल्पना होती, हे बोलणं क्वचितच अतिशयोक्ती ठरेल पण त्यांच्या घेतलेल्या निर्णयांवर नजर फेरता तुम्हाला हे पटून ही जाईल.

मग हेक्झावेअर ने त्यांना अमेरिकेत संधी दिली आणि ते पोहचले; प्रचंड वेगाने आधुनिकतेत प्रवेश करणाऱ्या जगात, ते महत्वकांक्षी होते, काय करायचं ते त्यांना स्पष्ट माहिती होत. कुठल्याही भावनेचं गुंफण त्यांच्या अवती भवती नव्हतं; साथीदार हा खंबीर आणि समविचारी होता. त्या काळात अमेरिकेत भारतीय कमी होते ही खंत त्यांना जाणवायची, आईने म्हटल्याप्रमाणे आता वेळ होती समाजासाठी काही करायची, संतोष मुंबई सारख्या गजबजलेल्या शहरात वाढले होते, आसपास आपल्यासारखी संस्कृती जपणारी लोक असावी असं त्यांना वाटायचं, म्हणून त्यांनी न्यू हैम्पशायर मध्ये आल्यानंतर ४०-४५ भारतीयांना एकत्र आणून दिवाळी सारखे सण साजरे करणं सुरु केलं. मराठी भाषा आपल्या येणाऱ्या पिढीला लिहिता वाचता यावी म्हणून, नवीनच झालेल्या आपल्या नवीन समूहासोबत शिशुभारती शाळेत मराठी विभाग सुरु केला आणि

तिथे ते स्वतः शिकवू लागले, आज ते समाजाला देऊ शकत होते.

असे खूप उदाहरण असतील जिथे त्यांनी विचारही न करता मदतीचा हाथ पुढे केला आहे, असा हाथ जो विसरभोळा होता. कुणाच्या शिक्षणाची जिम्मेदारी, किंवा कुणासाठी फीस भरायची असेल तर ते आवर्जून समोर आलेले विधान आहेत, विचाराता ते 'हो का?' ह्या दोन शब्दांनी  या विषयावर बोलायचे टाळतात.

सकारात्मक दृष्टीकोन ही यशाची गुरुकिल्ली असल्याचे म्हटले जाते; आणि ध्येयाकडे वाटचाल करत असताना, आपला सूर न डगमगता, कठीण वेळी सकारात्मकता आणि संयम यांचा समतोल राखणारं व्यक्तिमत्व म्हणजेच संतोष साळवी. मधल्या काळात त्यांनी रिअल इस्टेट क्षेत्रातही पाऊल टाकले आणि प्रचंड यश मिळवलं, जरी सुरुवात कठीण होती, परंतु संयम आणि धैर्याने त्यांनी काळाशी जुळवून घेतले.

समोर २००८ मध्ये आर्थिक मंदीचा सामना करताना, त्यांनी आपली नोकरी गमावली, परंतु ते डगमगले नाही, काळाची गरज लक्षात घेऊन, त्यांनी आपले कौशल्य अद्यतनित करण्यासाठी पुढाकार घेतला आणि पुण्यात जाउन नवीन प्रोग्रामिंग शैली विकसित केली.

पण पुण्यात त्यांच्या ध्यासाला वेगळं वळण मिळालं, मंदीमध्ये कोणीही आपली नोकरी गमावू नये या निर्धारानं त्यानी स्थापन केली, युनिक सिस्टम स्किल्स एलएलसी एक अद्वितीय संस्था जी परदेशात रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या किंवा नवीन स्किल्स आत्मसात करून विदेशात जॉब स्विच करू इच्छिणाऱ्या व्यक्तींसाठी वन स्टॉप डेस्टिनेशन ठरलं, नंतर २०१२ मध्ये त्यांनी पुणे, महाराष्ट्र येथे IT डेव्हलपमेंट आणि बिझनेस प्रोसेस सेंटरची स्थापना केली. आज, Nashua आणि पुणे हे दोन्ही institute महाविद्यालयीन आणि corporate job धारकांना आयटी सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण देत आहे. आणि सध्या, परवानाप्राप्त technical institute New Hampshire, Massachusetts, Vermont, Maine, and Pennsylvania या राज्यांमध्ये कार्यरत आहे. आणि नुकतेच ऑगस्ट २०२३ मध्ये बहरीन इथे नवीन कार्यालय सुद्धा सुरू केले आहे.

संतोष साळवी एक अनोखे व्यक्तिमत्व आहे; जे आपल्यात बसून हे तुम्ही पण करू शकता याची जाणीव करून देते, तुम्हाला त्यांच्या भाषेतून कळते कि हे व्यक्तिमत्व किती सहज आणि सोपं आहे. म्हणतात ना आयुष्यात चिंता झोप उडवते आणि स्वप्न हे निद्रेतही चेतत ठेवतात. तळमळ हा साजेशा शब्द नाही पण काही करण्याचा ध्यास आणि समाजाला काही देण्याचा ध्यास हे संतोष साळवी यांना प्रेरणा देते.

दालनात गर्दी असेल पण त्यांना हुरहूर नसते कि आपल्याला कोणी वेगळं ओळखावं किंवा आपण वेगळं दिसावं, संतोष सहज तुमच्यात बसणार आणि तुम्हाला सहजपणे मदतीचा हाथ देणार, यश हे सरळ आणि सातत्याने प्रयत्न करत राहण्याचे परिणाम आहेत, हे त्यांना बघितल्यावर कळते, आजही ते भारतातील मूल्य आणि अमेरिकेतील विचारशैली दोनहींचा समन्वय सधतात, म्हणूनच त्यांना आज ग्लोबल सिटीजन म्हणून संबोधलं जात. जगात कमी लोक असतात जे लोकांना सहजतेचा अनुभव देतात त्याचपैकी एक म्हणजेच संतोष साळवी.

# Building Success: Career, Family and Real Estate

- संगीता शेरे



When I arrived in Boston, MA in 1995 as a newlywed, I had no specific goals in mind, except to become financially independent as soon as possible. Having learned a bitter lesson very early in life, I had come to value self-sufficiency as being foundational for one's own self-esteem and self-respect. After enrolling in a Computer Information Systems program at Bentley University, I eventually graduated with my Master's degree, and took my first step toward my goal of independence as I embarked on a career in the information technology industry.

Over the next few years, I was blessed with two beautiful sons, and suddenly I had a new priority to ensure the best possible life and education for them. However, my aspirations for my older son Shikhar were complicated after he was unexpectedly diagnosed with autism. Though this diagnosis thrust me into a new, uncertain world, I quickly became determined to fully understand his needs and to eliminate any obstacles impeding his ability to reach his full potential. My commitment to my son became my most deeply held value, and his happiness, the most significant goal in my life.

As my son grew older, I discovered new purpose in imparting lessons I had learned from his journey to parents of children who were just beginning theirs. Helping new families navigate the challenges of special needs parenting became a huge part of my identity. Along the way, I realized I had a strong capacity for listening to and understanding people's needs, helping them problem-solve, and encouraging their confidence.

Alongside my family life and managing a home-based special education program for Shikhar, I juggled my now extensive career as a software professional in the technology and financial services industries. Though life was often challenging and hectic, I had learned that the process of trying to maintain balance can sometimes lead to new perspectives and

unexpected discoveries about one's own abilities.

About ten years ago, I decided on a new goal for myself – becoming a Realtor®. I was first drawn to the real estate profession in 2011 when my husband and I decided to upgrade to newer home. The thrilling experience of being an involved, well researched home buyer turned into a passion that I could not shake.

I was confident that I had the skills needed to be successful. Working in highly challenging industries had trained me to be a top performer and to always bring professionalism and integrity to the table. Additionally, I knew that the emotional intelligence I had gained from being an autism parent and mentor would allow me to deeply understand my clients' needs. I promptly got licensed as a Realtor® and began my real estate career, helping clients buy, sell and invest in residential real estate.

It brings me immense joy to help my clients transition from the current stage of their lives into the next, whether it is by purchasing their first home, selling their old home and upgrading to their "forever home," or downsizing from their family home to a more manageable, low maintenance condo living. The smile on their faces when they become proud homeowners is priceless. It is this smile that continues to fuel my passion in real estate. I am privileged to earn the trust of my clients, and to be referred to their friends.

Success is hard to define, because it is so relative. For me, success has meant dedicating myself to my family, realizing financial independence, and achieving my software and real estate career goals. For others, success may look different, but the ingredients are the same. At the foundation is a conviction in one's values, and yet an openness to accepting new and unexpected ones. This strong but flexible framework generates goals that can be achieved with realistic but meaningful steps, and which should be pursued with determination and a belief in oneself.

Of course, success does not happen in a vacuum. In my case, it was the unrelenting encouragement and unwavering support of my husband Aniruddha that helped me achieve all my goals. In addition, my two beautiful children, my parents, parents-in-law, two brothers, and my caring friends rounded out a strong support system.

Ultimately, I would encourage those seeking success to identify the tenets they care deeply about and to lean on loved ones when needed. With your values as a guide, and with the support of those around you, success is all but guaranteed.

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
New England Marathi Mandal

## Looking for a Graphic Designer

Good Volunteering oppourtunity at NEMM.

# SKVL: My Journey

- प्रतीक्षा मोरे



A young woman from hamlet with a great passion for nature in her heart. During her childhood, she spent her days around agriculture and farming. Naturally, she knows the gravity of natural things which consists of freshness and organic temperament. In the modern world of pollution and unhealthy food, she wanted to bring a change with the help of organic & Ayurveda. She formed the company SKVL Organic World, with a handful of people who joined her with passion that she had. Being in Dairy industry, she preferred to have a clean milk, after reading several text from Ayurveda and found the original cows that can produce the milk that body can digest at the body temperature. She tested all the cows for A2 Beta Casein and certified the milk in NABL labs. Another initiative, that she took to make the farm as "Curtly free Farm". Cows stays in the farm till the end of the life, so that our customer would get the Bliss feeling, when they consume our product and her team would get satisfaction of "Celebrating life with cows".. which also has deep feeling of "GAU – MATA" Journey started in India and because of her husband's job in IT, family shifted to USA in 2008. She introduced a game-changing superfood MoreA2 Ghee, that is not only rich in vitamins A, D, E, and K2, but it's also lactose-free, making it perfect choice for those with dairy sensitivities. She bring MoreA2 Ghee to natural retail stores in MA / RI / CT, which expanded her reach to 200 + store.

Her next leap is to setup farm in four states RI / FL / TX / CO. She continuously gives back to society what is earned as a part of her share in the company. Few of the philanthropic organization, that SKVL Organic Sponsors : Rhode Island Women Expo / COLORAMA (Colorado Ayurvedic Medical Association / Gayatri Pariwar New England – MA / My Ayurved / Vibha of Boston / ISW (India Society of Worcester) / NAMA (National Ayurvedic Medical Association) / TEPAS (Texas Ayurveda

Professionals Association) / VHPA (World Hindu Council of America) – BOSTON / Sarva Dev Mandir/SDM- Oxford Temple / United India Association of New England (UIANE)/ American Cancer Society / St. Jude Children's Research Hospital / Doctors Without Borders and more.

Do not settle for less… give More ☺

**Company : SKVL Organic World Inc**

**Founder : Mrs. Pratiksha More**
**Category : Women Owned / Fair**
**Trade Web : www.MoreA2.com**
**Email : Pratiksha.More@MoreA2.com**

MORE A2
SKVL ORGANIC WORLD INC
Journey of Dairy Industry in Wellness
Producer of Gir A2 Milk & Milk Products

## Looking for a Graphic Designer

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

Good Volunteer oppourtunity at NEMM.

Graphic Designer Needed for Anubandh Magazine.
Please contact: registration@nemm.org

# "Unveiling Dreams: A Blessing in Disguise"

- प्रिया सामंत



If the pages of my life were to transform into a book, it would be titled "Unveiling Dreams: A Blessing in Disguise." Let me share why in my story.

I was born in a suburb of Mumbai in a loving family that cared about social causes. I was raised in a town called Goregaon which is also home to the well known “Film City”. As the youngest member of a family enthusiastic about arts, sports, and devoted to community service and social impact, I was greatly shaped by these influences. My early admiration was drawn to my uncle's efforts in treating and rehabilitating leprosy patients and the political engagement of my extended family.

I was passionately drawn to arts and culture, spending my summers immersed in various crafts such as glass painting, embossing, and crafting stuffed toys. As a young girl, I aspired to create and sell these stuffed toys to retailers in Mumbai. Little did I know that this early entrepreneurial spirit would become a defining aspect of my journey. Additionally, I actively engaged in dramas and elocution competitions during my school days. In college, I proudly represented my college in many engineering intercollegiate festivals in Mumbai in the singing category.

After completing my education, I started working for ICICI bank in their technology group. My career started on a very high note, however I wanted more. My young mind wanted to explore and travel to different parts of the world. In the late 90’s there was the Y2K boom and many tech professionals were hired from India to work in the US. I saw that as an opportunity to challenge myself, leave behind a very sheltered life and experience a new world. In the year 2000, I took that leap of faith and came to Boston for work. It was the month of April and it had snowed. I had seen snow only in movies. When I experienced it for the very first time it felt magical. Coming from a big city, adjusting to a foreign land was very easy for me however the reality of being a young immigrant on a visa struck when the economy tanked during the dot.com bust. I learned some valuable life lessons during that time

Like many immigrants on an H1B visa, my career commenced in the corporate technology sector,

offering me opportunities with Fortune 100 companies. Through sheer determination, I ascended to mid-management. My life journey progressed, I got married and embarked on a Master's program in Management following the birth of my first child. Managing a full-time job, caring for a newborn, and pursuing a master's degree taught me the invaluable skill of time management. It was during my academic journey that I was introduced to the world of "Entrepreneurship".

My career trajectory underwent a significant shift during my second pregnancy which began my entrepreneurial journey - A blessing in Disguise. Advised to complete bed rest and with my second child born with health issues requiring attention, I made the decision to take a hiatus from the corporate world to focus on my young family. When my younger son turned one, I initiated a project that blended my passion for arts, culture, and social impact. This venture, "EarthFrendz," emerged as a for-profit social enterprise ahead of its time, aiming to address climate change and alleviate poverty through fashion. It provided a platform for impoverished artisans from India to showcase their talent making fashion accessories from remnants of textile waste. I independently expanded the vision, progressing from selling accessories at farmers' markets to retailing products through Whole Foods Market stores across multiple states in America. This journey earned me recognitions, including a nomination as The Aspen Institute Scholar by The Alliance For Artisan Enterprise and an invitation from the US State Department to Washington DC for the launch of the Global Artisan Campaign, among other awards and accolades. Press and media coverage followed, and I received invitations to speak at prestigious events.

The journey has undergone a significant transformation, shifting from technology to social entrepreneurship and circling back to technology. Along the way, I've encountered valuable lessons, surmounted challenges with patience and perseverance, and derived immense satisfaction from creating impact in everything I do. Fast forward to the present, and I am honored to serve as the CEO and Co-Founder of a tech startup located in Andover. Leveraging my experiences in retail and technology, our remarkable team is dedicated to assisting retailers through uprate.ai Our unique selling proposition focuses on enhancing merchant revenue through shopping cart elevation while ensuring customers enjoy a tailored shopping experience.

Throughout my journey, I have consistently immersed myself in advancing arts, sports and cultural diplomacy, as well as engaging in political causes. This involvement extended to serving as a member advisor on the tech and innovation policy committee during the 2016 Presidential Election for Hillary Clinton and the 2020 US Presidential election for Joe Biden. Additionally, I played a pivotal role on the leadership team of TedxBeaconStreet, serving as a speaker catalyst for prominent figures in politics and diplomacy such as Governor Dukakis ,3x MA Governor and 1988 US Presidential Candidate, Former Boston City Councilor and the current Attorney General of Massachusetts Andrea Campbell, Steve Rothstein Former Executive Director to JFK Library Foundation, First Lady of Iceland Eliza Reid, and many others. Recognizing a gap in how impact narratives are presented globally, I conceived and launched the concept of impact advising for cause and culture-

based cinema in 2019. Now, with six films to its credit, this initiative is  gaining momentum in Indian cinema, with two movies listed for Oscar consideration in 2020 and 2021, and two films achieving commercial success in 2022 and 2023 creating a movement.

Over the years, I've had the chance to speak at significant events like Davos World Economic Forum, the United Nations General Assembly, and Horasis. These experiences allowed me to engage with leaders across business, religion, and politics, members of the Royal family, celebrities shaping my perspectives on global economic challenges and opportunities. I also played a role being appointed as the Director 8th International Day of Women and Girls in Science, a UN observance day hosted at the United Nations, addressing diverse audiences on global issues. These interactions reinforced my commitment to inclusive conversations and positive change. As I continue my journey, I aim to contribute meaningfully to the global discourse.

# इतर कथा व कविता

## आमची अमेरिकेची वारी

- भास्कर पवार



रात्री सव्वादोनची वेळ. गुरूवार, ०४ जून २००४ मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरून आमच्या ब्रिटीश एअरवेजच्या बोईंग विमानाने रनवे'वर धावण्यास सुरूवात केली. विमानतळाचे दिवे भराभर मागे टाकत विमानाने वेग घेतला. त्याआधी विमानाच्या संबधात सुरक्षीततेचे उपाय, सिटबेल्ट बांधण्याच्या सुचना, पायलट व क्रू यांची नावे, आणीबाणीच्या परिस्थितीत घ्यावयाची काळजी, इत्यादी बाबत सूचना करण्यात आल्या. आम्हांला विमानात खिडकीजवळची जागा मिळाली होती. माझा व रजनीचा हा पहिलाच विमान प्रवास होता. नाही म्हणायला हैद्राबाद्च्या 'रामोजी फिल्म सिटीच्या' विमानाचा आभास निर्माण करणा-या प्रतिकृतीच्या एका बाजूलाबसुन आपण विमानातच बसलोय असे फोटो काढले होते. विमानातील सीटच्यासमोर छोटा टिव्ही होता. आर्मरिस्ट्च्यावर स्क्रिनकंट्रोलची वेगवेगळी बटणे होती. १ते१८ चॅनेल होते त्यावर वेगवेगळे सिनेमे व शेवटचा चॅनल होता मॅपचा. त्याच्यावर विमानाची गती, मुंबईची आत्ताची वेळ, पोहोचणा-या ठिकाणाची आत्ताची वेळ, म्हणजेच लंडनची स्थानिक वेळ, विमानाची सध्याची जमिनीपासूनची ऊंची, इत्यादी माहिती वेळोवेळी येत होती. विमानाने आता खूपच वेग घेतला होता. साधारणतः ३६,०००० फूट उंचीवर गेल्यावर ते स्थिरपणे उडू लागले. खिडकीतून खाली पाहताना खाली-खोलवर जमिनीवरील लुकलुकणारे प्रकाशाचे बिंदु लहान लहान होत लुप्त होत चालले होते. पड्द्यावर विमानाचा वेग दिसत होता. ताशी हजार किलोमीटर वेगाने विमान ३६,००० फूट ऊंचीवरुन उडत होते. बाहेरचे तापमान वजा ३०-४० सेंटीग्रेड्च्या आसपास होते. विमान हवेत झेपावताना पोटात कसेतरी होते असे वाटत होते पण विमान आकाशांत कधी झेपावले व केंव्हा स्थिर झाले हे समजलेच नाही. रजनीचा सुध्दां हाच अनुभव होता. समोरच्या स्र्किनवर विमानाच्या मार्गाचा नकाशा होता. त्यांत अरबी सम्रुद्र सोडल्यानंतर काळ्या समुद्रापर्यंतचा प्रवास भुभागावरुन होणार असल्याचे दिसत होते. विमानातील ह्या नवलाईतून हवाई सुंदरीच्या मंजुळ आवाजाने भानावर आलो. स्वच्छ ग्लासातून पाणी व ज्यूस देण्यासाठी तिने " एस्कुज मी" म्हंटले होते व सीटसमोरील छोटा ट्रे ओढून त्यावर पाण्याचे व ज्यूसचे ग्लास ठेवले. ते थोडे सुध्दां

हिंदकळत नव्हते, एक थेंबही सांडत नव्हता. जाता-जाता हवाई सुंदरीने खिडकीचे शटर बंद करण्याची विनंती केली. ती नाकारणे मला शक्य झाल नाही. आमचे विमान ब्रिटीश एअरवेजचे होते. मुंबईला वेटींग-रुममधे बरेच प्रवासी होते. पण त्यातले महाराष्ट्रीयन कोण व परदेशी कोण हे कपडयावरुन ओळखणे कठीण होते. विमानतळाच्या बाहेर मुलगी स्वाती, जावई अजय, नातू अभिषेक व माझे व्याही श्री. बुलबुले हे सर्वजण थांबलेले होते. चेकींग झाल्याचे त्यांना फोनवरुन सांगितले.व परत १० मिनिटांनी फोन करतो असे म्हटले होते. परंतु वेटींग रुममधल्या फोनवरुन नेहमीप्रमाणे काही केल्याफोन लागला नाही. एका सहप्रवाशाच्या मोबाईलवरुन मुंबईत राहणारे जुने स्नेही सुर्यकरांकडे फोन करुन जावई-अजय यांना फोनकरण्यास सुर्यकरांना सांगितले. व तसेच पुण्याला जायला निरोपही दिला.या सर्व गडबडीत एक वयस्कर गृहस्थ आमच्याशी मराठीतून बोलले ते आमच्या बरोबर-विमान प्रवासतही बरोबर होते. आयुष्यात कधी एवढया मोठ्या प्रवासाचा योग यईल असे स्वप्नातही वाटले नव्हते. माझा मुलगा योगेश याला अमेरिकेत जाउन पांच वर्ष झाली होती. या अगोदर त्याच्याकडे जाण्याचा योग नव्हता. नोकरी-सोनलचे (घाकटीमुलगी) लग्न,योगेशचे लग्न व अमेरीकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ला यामुळे त्याच्याकडे जाण्याचा विचार करणेही शक्य नव्हते. पण योगेशने स्थिरस्थावर झाल्यावर प्रथम कोणते काम केले असेल तर, आम्हां दोघांना अमेरिकेत येण्यासाठी करावी लागणारी व्हिसा- कागद पत्रांची पूर्तता, त्यासाठी कायकाय करावे लागेल या बाबतची संपूर्ण जंत्रीच त्याने पाठवली होती. व्हिसा काहीही त्रास न होता मिळाला. तिकिटांची, इन्शुरन्सची, पूर्तता झाली. युकेच्या ट्रान्सीट व्हिसाचा विषय बरेच दिवस चर्चेत राहिला .कारण आमचे विमान मुंबई-लंडन, लंडन-बोस्टन असे जाणार होते. लंडनला ३ तास विमान थांबणार होते. त्यासाठी ट्रान्सीट व्हिसा आवश्यक आहे का नाही यासाठी ब-याच वेबसाईट्वर जाऊन माहिती घ्यावी लागली होती. काही ठिकाणी इमेल ही केले. काहींची उत्तरे होकारार्थी तर काहीची नकारार्थी आली होती. शेवटी युके-काऊन्सिलेटने सर्व विमान कंपन्यांना पाठविलेले अलिकडचे परिपत्रक वेबसाईटवर मिळाले, त्यांची प्रिंट करुन बरोबर ठेवायची असे ठरवलं होते. विमान आता ३६,००० ते ३९,००० फूट ऊंचीवरुन उडत होते. तास-दि ड्तांसाचाच प्रवास झाला होता. आता जेवण आले. काही पदार्थ चवदार तर काही अगदीच बेचव होते. रजनीने पूर्ण शाकाहारी जेवण घेतले होते. मी मात्र एशियन नाॅनव्हेज - त्यात आम्लेट्खेरीज दुसरे काहीच आवडले नाही. ब्रेड,बटर बरे होते. पाणी मात्र अतिशय स्वछ व स्वछ ग्लासात होते. समोरच्या स्क्रिनवर विमान सध्या कुठे आहे? कितीउंचीवर आहे, व मुंबईला किती वाजले हे कळत होते. माझे घड्याळ मुंबईच्या वेळेनुसार तर, हिचे घड्याळ लंडनच्या वेळेनुसार लावले होते. मनांत वेळेचा हिशोब करत प्रवास चालला होता. सकाळ्यासूनची दगदग-- पुणे-मुंबई प्रवास यामुळे हिला डुलकी लागली होती. मी मात्र स्क्रिन-वरचे वेगवेगळे देश,सुंदर शहरे,व त्यांची नावे पहात होतो. लंड्नला पोहोचण्याची वेळही मधूनमधून स्क्रिनवर येत होती. मुंबईतून निघताना वाटत होते की, सिनेमांत दाखवतात तसे विमानतळावर चालत जाऊन विमानाला लावलेल्या शिडीने विमानांत चढायचे. परंतु वेटींग-रुममधून निघाल्यावर बंद पॅसेजमधून चालत जाऊन कधी विमानात पोहोचतो ते कळलेच नाही. सीट शोधण्यासाठी हवाई सुंदरीने तप्तरतेने मदत केली. विमानात स्पिकरवरुन सूचना देताना त्या इंग्रजी बरोबर हिंदीतूनही देण्यात येत होत्या. गुजराथीतूनही सूचना देण्यांत येतील असे सांगितले . परंतु शेवटपर्यंत गुजराथीमधून सूचना काही दिल्या नाहीत. ब्रिटीश एअरवेजच्या हिंदीतून सूचना ऎकताना बरे वाटले, वाटले ब्रिटीशांनी १५० वर्ष भारतावर सत्ता गाजवली त्याचे परिमार्जन करत असावेत .दुसरा विचार आला की, मार्केटिंगची ही धंदा वाढवण्याची खुबी तर नसेल ना असो. लंड्नचे अंतर मिनिटा- मिनिटाला कमी होऊ लागले होते. मधेच डुलकी लागत होती. मनांत एक अनामिक हुरहुर वाटत होती. युकेच्या स्थानिक वेळेनुसार विमान सकाळी ७.३५ ला हिथ्रो विमानतळावर उतरणार होते. मुंबई ते लंडन हा प्रवास ९ तास ५० मिनिटांचा होता. विमान मात्र ७ वाजताच हिथ्रो विमानतळावर उतरले. त्या अगोदर सिटबेल्ट बांधण्याच्या सुचना देण्यांत आल्या. विमानतळावर उतरतांना खालचे द्रृश्य अतिशय मोहक होते. चित्र काढल्याप्रमाणे प्रमाणबध्द व सुबक रस्ते, नद्या, नद्यांवरील पुल, इमारती. एखाद्या प्रदर्शानांत मोठ्या शहरांची लहान प्रतिकृती ठेवावी असे ते चित्र डोळ्यांत साठ्वून ठेवतो न ठेवतो, तोच विमान धावपट्टीवर अलगद उतरले, रनवेवरुन धावत-धावत टर्मिनल ४ लागलेसुध्दां, आधाराशिवाय न चालणारे प्रवाशी ,वयस्कर प्रवाशी, मूलबाळ घेवून जाणारे प्रवाशी यांना विमानांतच थांबवून अगोदर इतर प्रवाशांना बाहेर

पडू दिले जात होते. विमानाचे पायलट, क्रू, हवाई सुंदरी प्रवाशांना निरोप देण्यांसाठी दारातच उभे होते व हसून 'बाय बाय' करत होते. हिथ्रो विमानतळावर पाऊल ठेवले. इंग्रजांच्या भूमीवर आपल्यांला कधीकाळी पाय ठेवता येईल असे वाटले नव्हते. याच भूमीवरुन हिंदुस्थांनात येऊन १५० वर्ष राज्य करणा-या ब्रिटीश नागरिकाला शोधण्याचा उगीचच असफल प्रयत्न केला. नक्की इंग्रज कोण ? साऱ्या जगातले असंख्य लोक विमानतळावर दिसत होते. 'हिथ्रो' विमानतळ हे जगातील सर्वात मोठे विमानतळ आहे. तेथे अनेक ठिकाणी एक्झीट व ट्रांझीटचे बोर्ड होते. मी ट्रांझीटचा मार्ग जिथे नेईल तिकडे हातातील बॅगा साभांळ्त जात राहिलो. पुन्हा एकदां मेटल डिटेक्टरने सामान व सर्व शरीराची तपासणी झाली. आमचे पुढचे विमान त्याच टर्मिनलला लागणार होते. टर्मिनलला २५ गेट्स होते. त्यापैकी कोणत्या टर्मिनलला विमान पार्क होणारहे दिसण्यांसाठी अनेक डिस्प्ले विमान तळावर मौजूद होते, व ते इतर विमानांच्या बाबतीत तसे दाखवतही होते. परंतु आमचे विमान कुठे लावायचे हे त्यांचे ठरलेले नसावे म्हणून 'थांबा व पहा' अशीच पाटी दिसत होती.शेवटी अर्धातास तिथे थांबून कंटाळा आला म्हणुन रजनीला तिथेच उभे करुन मी फोन करावा. म्हणून जवळच असणा-या बुथपाशी गेलो. तेथे सर्व व्यवहार पौंडातले. माझ्याजवळ भारतीय नोटा व अमेरिकन डॉलर्स , एका भल्या गृहस्थाने माझी अडचण ओळ्खून इंग्रजीतून मला मार्ग-दर्शन केले, त्याच्या इंग्रजी उच्यांरातून सर्वच काही कळले असे नाही, फक्त इतके कळले की थोड्या अंतरावर कार्ड विकत मिळतात. तिथे जाण्याचा मार्ग खुणेने त्याने सांगितला. तिथे जाऊन १३ डॉलर्स खर्च करुन ५ पौंड किंमतीचे फोन कार्ड घेतले, त्या कार्डावरील नंबर स्क्रॅच करुन योगेशला अनेक प्रयत्नानंतर फोन लागला. परंतु तो व्हाॅइसमेलला गेला. त्याला निरोप ठेऊन , ही उभी होती तिथे परत आलो. अजुनही विमान कोणत्या गेटला लागणार याचा डिस्प्ले अद्यापही येत नव्हता. विमान तळावरील खुल्या बाजारात चक्कर मारायचे ठरवून निघालो, ह्या 'डयुटी फ्री' दुकानातून काय म्हणून विक्रीला नव्हते,...-टिव्ही, कॉमेरे, व्हिडीओ शुटींगचे अद्ययावत कॅमेरे, मल्टीमिडीयाचे जगातले एकूणएक प्रकार, विविध प्रकारचे चॉकलेट, इ विक्रीला असलेली भव्य दुकाने, काचेच्या विविध रंगाच्या व आकाराच्या वस्तू, मुलांचे कपडे, खेळणी, पुस्तके, वेगवेगळ्या आकाराच्या बाटल्यातून भरलेली मदीरा, एकास एक फ्री सौंदर्यप्रसाधने, सुकामेवा, अत्याधुनिक वस्तू.- काय म्हणून त्या बाजारपेठेत नव्हते. जाहिरात करण्यासाठी एक फिरती कारही त्या ठिकाणी होती.त्या प्रचंड मार्केट्मधले ग्राहक मात्र सर्व प्रवासी होते, किती तरी वर्णाचे, धर्माचे, जातीचे, स्त्री-पुरुष, मुले, वयस्कर माणसे, कॅरीयरवर सामान ठेउन इकडून तिकडे फिरत होते. किती वाजले हे डिस्प्लेवरुन समजत होते. येथे उतरुन आता साधारण १ तास होत आला होता. मन बाजारातील वस्तुंच्या किंमतीचा अर्थात पौंडात हिशोब करत होते एखाद्या वस्तूला किती डॉलर द्यावे लागतील व त्याचे रुपये किती हे मनातल्या मनात ठरवित होते मधेच एका ठिकाणी रेस्टरुम दिसली. मग आळीपाळीने बॅगा सांभाळत वॉश घेतला. अद्यापही विमान कुठे लागणार हे समजले नव्ह्ते. शेवटी माहिती देणा-या कांऊटरवर बोस्टनला जाणारे विमान कोणत्या फलाटाला लागणार आहे हे विचारले असता २३ नबंरच्या गेटवरआमचे विमान लागणार असे कळले, त्या गेटकडे जाणारा मार्ग बाणाने दाखवला होता. आम्ही उभे होतो तेथुन २३ नंबर गेट्पर्यंत जायला साधारणपणे ३० मिनिटे लागणार होती. विमानाची वेळ १० वाजुन ५५ मिनिटे होती. आता साधारण नऊ सव्वा नऊ झाले होते. गाडी ढकलत ,गप्पा मारत आम्ही आजुबाजूची नवलाई पहात क्रं २३ कडे निघालो. मधूनच मागून घंटी वाजवत एखादी लहान कार(फ़्लॅक--वयस्कर प्रवाशांना घेवून जाण्यासाठी असणारे छोटे वाहन) येत होती. त्यातला प्रवाशी वयस्कर दिसत होता, परंतू ती गाडी चालवणारा सुध्दा वयस्करच होता. ; एकदाचे २३ नंबरचे गेटवर येऊन पोहोचलो. तिथे असलेल्या चेअर्सवर आराम करत बसलो. सुमारे अर्धातासाने विमानात बसण्यासाठी सोडण्यात येणार होते. काचेच्या तावदानातून आम्हाला नेणारे विमान दिसत होते. मुंबईला आमचे विमान बाहेरुन कसे दिसते, ते आम्हांला बघायला मिळालेच नव्हते. आता मात्र ब्रिटीश एअरवेजचे विमान दिसत होते. विमानांत प्रवाशी-सामान चढवण्याचे काम चालू होते.प्रचंड मोठ्या जाळीच्या कंटेनरमधे अनेक प्रवाशांच्या बॅगा, लगेज, अनेक मोठी गाठोडी, क्रेनच्या साह्यांने ठेवण्यात येत होती. आमच्याही बॅगात्यात असाव्यात. विमानतळाच्या ४ नंबरच्या टर्मिनलचा थोडाच भाग दिसत होता. डावीकडे गेट क्रं २२-२१-व पुढे २४ असे गेट दिसत होते. प्रत्येक गेटवर ब्रिटीश-एअरवेजची विमाने होती. आकाशांतून साधारण मिनिटाला एक विमान खाली येतांना किंवा आकाशांत झेपावताना

दिसत होते. लंड्नच्या विमानतळावरुन १० वाजता विमानात बसण्याची परवांगी मिळाली. परत आम्हाला खिडकीजवळील जागा मिळाली. ३ सीटच्या रांगेत खिडकीजवळ रजनी, नंतर मी व मग एक कृष्णवर्णीय तरुण बसला. विमानांत 'क्रू' ने अतिशय अदबीने स्वागत केले. प्रवास उत्तम होणार याची खात्री पटत होती. यावेळी तीन सिटच्या रांगेत असल्याने थोडी अडचण भासत होती खरी -पण महाराष्ट्र महामंडळाच्या एसटी प्रवासाची आठवण करुन घेता-- ह्या सीट केव्ह्ढ्यातरी सुखकारक होत्या, विमानाने आता निघण्याच्या सूचना दिल्या. बेल्ट लावण्यांस सांगण्यात आले. ह्या सुचना मात्र एकूण एक प्रवाशी अत्यंत प्रामाणिकपणे अमलात आणतांना दिसत होते. थोडयाच वेळात विमानाची घरघर सुरु झाली. पण धावपट्टीकडे निघण्याची काही चिन्हे दिसेनात. शेवटी सूचना आली की, विमान अर्धा तास उशिरा सुटेल, मग पुन्हां बेल्ट सोडले, व विमानात काही भारतीय चेहरे दिसतात का ते पाहू लागलो.पण एकही भारतीय दिसत नव्हता. नाही म्हणायला एक दाक्षिणात्य जोडपे दिसले ४-५ रांगा सोडून बसले होते. आता जवळपास पाऊण तास झाला होता.पुन्हां एकदा सूचना झाली यावेळी मात्र काही तांत्रिक कारणाने खोटी झाली आहे. व थोडया वेळातच पुढचा प्रवास सुरु होईल असे सांगून दिलगिरी व्यक्त केली. अशा ४ वेळा सूचना देऊन शेवटी २ तास उशिराने विमानाने घावपट्टी-कडे धावण्यास सुरूवात केली. विमान उशिरा सुटण्याचे कारण, विमानाचा लगेज चढ्ण्याचा दरवाजा बंद होत नव्हता. हे आम्हांला शेवटच्या सुचनेतून कळ्ले. हिथ्रो लंडन ते बोस्टनचा प्रवास ८ तासांचा होता. आता विमान घावपट्टीवरुन वेगाने निघून आकाशांत झेपावले सुध्दां. खिडकीतून लंड्न शहराचे विहंगम दृश्य दिसत होते. रस्ते, इमारती, कुठे हिरवागार निसर्ग, तर कुठे नद्या, तलाव, पूल, इत्यादी आता विमान उंच ढगात गेले. खालचे दृश्य ढगात धुक्यात लपून गेले. आजुबाजूला ढगच ढग नसतील तर फक्त पोकळी. आता विमान ३६,००० फुटांवरुन उड्त होते. विमानाचा मार्ग टिव्ही वर दिसत होता. आता पुढचा प्रवास समुद्रावरुन होता. अटलांटीक महासागरावरुन आमचे विमान जाणार होते. विमान स्थिर होताच खाण्याचे पदार्थ द्यायला सुरवात झाली. प्रथम ज्यूस आले. हवे ते ज्यूस मिळत होते. आमच्या शेजारच्या प्रवासी मित्राने वाइन घेतली. जेवणांत पालकभाजी, पराठे, मुगाची उसळ, सॅलड, टॅमाटो सूप व चॉकलेट, पण होते. थोडे जागत थोडे झोपत असा प्रवास सुरु होता. शेजारचा मित्र आता जरा आनंदलेला दिसत होता.त्याच्या चेह-यावर थोडे स्मित होते. त्याने हाय पण केले. ३/४ तास असेच गेले. पुन्हा जेवण आले. भारतीय पदार्थ घेतले. शेजारच्या मित्राने परत २ बाटल्या मागवल्या. १ मला देऊ केली.'साॅरी' म्हटल्यावर त्याला बरे वाटले.असे दिसले. कारण त्याच्या पेयाच्या वाट्यात मी सामील झालो नव्हतो. आता बोस्टन आता १ तासावर राहिले होते. विमान खरे तर त्या वेळेनुसार १ वाजता पोहोचणार होते. त्याआधी विमानात इमिग्रेशनचे फार्म भरुन ठेवले. विमान आता विमानतळाभोवती घिरट्या घालू लागले. कदाचित धावपट्टी मोकळी नसावी. पुन्हां एकदां बोस्टनवर एक मोठी फेरी मारली. विमानातून बोस्टन शहर अतिशय सुंदर दिसत होते. समुद्रावरील कमानीचा पूल, उंचच उंच इमारती,रस्ते, अगदी स्पष्ट दिसत होते. मनांत इतिहासातील बोस्टन टी-पार्टी इथेच कुठे तरी झाली का? असा विचार आला. शेवटी ३ वाजता विमानबोस्टनच्या विमानतळावर उतरले. थोडासुद्घां घक्का बसला नाही. लगत अगदी पिसासारखे उतरले. पुन्हां तपासणी, स्क्रिनिंग, बॅगा, ताब्यात घेणे व फिंगर प्रिंटीग इत्यादी सोपस्कार झाले. शेवटी निघताना सुध्दां बोस्टनच्या विमानतळावर सुरक्षा-रक्षकाने विचारले," आंबे वैगेरे आहेत का बॅगेत ? आमच्या नाही म्हणण्यावर त्याने चटकन विश्वास ठेवला. आम्ही तेथून निघालो. या सर्वात साधारण ४५ मिनिटे गेली होती. आता उत्कंठा शिगेला पोचली होती. बॅगा ढकलत आणि नजरेने योगेश- कोठे दिसतो का? ह्याचा शोध घेत बाहेर आलो. योगेश ने आम्हाला वाकून नमस्कार करुन पुष्पगुच्छ कधी हातात दिले हे पाणावलेल्या, हरवलेल्या नजरेला दिसलेच नाही. आयुष्यांत आपल्या मुलाने येवढे सुंदर स्वागत करावे हे खरोखरच मोठ्या भाग्याचे. आयुष्यांत कधीही न विसरण्या-सारखे ते क्षण तो प्रसंग. एक सुंदरसे ग्रिटींग योगेशने आणले होते. योगेश ने चॉकलेटस आणले होते. ते आम्हांला खायला लावले. आता बॅगा ओढण्याची जबाबदारी त्या दोधांनी घेतली. विमानतळाच्या बाजूलाच असलेल्या पार्किंग लॉट्मधे ठेवलेल्या गाडीकडे गेलो. आणि गाडीतून घराकडे आमचा प्रवास सुरु झाला. योगेशच्या घरी सुमारे एका तासात पोहोचलो. भव्य मोठे रस्ते, वेगाने जाणारी वाहने, मोठ्मोठे ओव्हरब्रिज सुंदर सुंदर घरे, घराभोवती हिरवळ नजरेत साठवत योगेश च्या घरात प्रवेश केला. प्रथम-दर्शनीच घर एकदम छान ठेवल्याचे दिसत होते. शुक्रवार ४ जुन २००४ चा दिवस होता.

बोस्टनला पोहोचलो तेथील तारीखही तीच होती. खरंच आपण अमेरीकेत आलो? मुलांना भेटलो? खरच का? स्वप्न तर नाही ना हे! आणि आरामखुर्चीवर कधी डोळा लागला ते कळलेच नाही. घर छान होते, मोठी वसाहत, ८ मोठ्या इमारती. त्यांत साधारण २४ अपार्ट्मेंटस सर्व बाजूंनी कंपाऊंड -वॉल -मधे हिरवळ, फुलांची झाडे,आणि मुख्य म्हणजे सर्व बाजूच्या इमारती-भोवतीने फिरायला रस्ते होते. मध्यभागी पोहण्याचा तलाव होता. अशा त- हेने सर्व सुख-सोईंनी युक्त अशी जागा होती. आता या वास्तूत ६ महिने वास्तव्य करावयाचे होते. माझा अगदी सिंहगड ते मुंबई, व पुढे लंड्नमार्गे बोस्टनपर्यंतचा प्रवास तुम्ही माझाबरोबर केलातच आता अमेरिकेतल्या गमती--जमती पुढ्च्या लेखात ..

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

## मदतीची हाक

मंडळातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमांना गरज आहे तुमच्या मदतीची , सहकार्याची, आणि सहभागाची.

नोंदणीसाठी कृपया संपर्क करा - http://nemm.org/index.php/requests/volunteer

***Student volunteering hours will be recongnized.

# गोपी टांगेवाला

- भास्कर पवार



रात्री तिन च्या सुमारास जम्मूताई एक्सप्रेस, आडगांवी थांबली एका मिनिटा साठी. प्रथमेश आपली पाठिवरील सॉक, व हातातली बॅग सांभाळत त्या स्टेशन वर उतरला. एक कर्कश्य सिटी फुंकुन थांबलेल्या गाडीने वेग घेतला, तिनचार मिनिटांत स्टेशन सोडुन ती वेगात निघुन गेली व आंधारांत नाहीसी झाली. प्रथमेश ने आता त्या रिकाम्या फलाटावर नजर टाकली. सर्वत्र सातसुम, चिटपाखरू ही फलाटवर दिसले नाही. कुणीही तेथे उतरलेले दिसले नाही. स्टेशन वरील रेस्टरूम तर अंधारात बुडुन गेले होते. रात्री तेथे थांबण्याचा विचार आपोआपच विरुन गेला. आता तिन मैलावर असलेल्या घरी जाण्याशिवाय पर्यायच नव्हता. प्रथमेश रेल्वे स्टेशन च्या बाहेर पडण्यासाठी पुला कडे गेला. पुलाच्या पायऱ्या चढतांना त्याला वाटु लागले की घरी फोन करून सांगावं आपण येत असल्याचे. पण पुन्हा वाटले नकोच आपण ठरविल्या प्रमाने सरप्राईज च देऊ या घरी. वाड्यातील आजी, आजोबा, बाबा, आई.,मोठे काका, मोठ्याई, नानाकाका, नवीकाकु, इंदु, शिंधु, बंड्या.,गोट्या, आत्याबाई, माध्या, सगळे कीती चकीत होतील आपल्या अचानक, न सांगता, येण्याने, एक रम्य छान चित्र प्रथमेश च्या नजरे समोर उभे राहिले. एम एस च्या शिक्षणासाठी तो मोठ्या शहरांत वर्षांपुर्वीच गेला होता. परीक्षा दोन महिन्यावर आली होती, म्हणून कॉलेज ला तशी सुटीच होती. होस्टेल च्या रुममेट नी आठ आठ दिवस घरी जाऊन येण्याचे ठरवले होते. प्रथमेश ने सरप्राईज ची कल्पना पुढे केली, पांचही मित्रांनी आनंदाने दुजोरा दिला होता. तसा प्रथमेश काल पहाटे गाडीत बसला व थोड्या वेळा पुर्वी स्टेशन ला उतरला होता. विचाराच्या तंद्रीत स्टेशन च्या मुख्यद्वारावर तो कधी येऊन पोहचला ते कळलेच नाही. बाहेर एकही रिक्षा, टॅक्सी, दिसली नाही. सर्वत्रच सामसुम दिसली. आता काय करायचं या विचारांत असतांनाच दुरवर रस्त्यावरुन दोन अंधुक दिवे स्टेशन कडे येतांना दिसले. हळु हळु स्टेशन च्या फाटकातुन काही तरी वाहान आंत येत आहे हे प्रथमेश ने बघीतले. एक टांगा जवळ जवळ येऊन पोर्च मध्ये उभा राहिला. प्रथमेश लगबगीने टांग्याकडे गेला. अरे हा तर गोपीचा टांगा, वा देवच पावला. "गोपीकाका तुम्ही इतक्या रात्री स्टेशन ला कसे? बाबांनी पाठवले कां? पण बाबांना तर माहीत नाही मी येणार आहे ते."

गोपी कांहीच न बोलता टांग्यातुन खाली उतरला,प्रथमेशने वाकुन त्यांना नमस्कार केला प्रथमेशची जडसीसॉक, व बॅग उचलुन टांग्यात ठेवली, व नजरेनेच टांग्यात बसा असे खुणावत स्वतः टांगा हाकण्या साठी जाउन बसला. प्रथमेश पटकन टांग्यात मागे जाउन बसला. प्रथमेश ला फार फार बरे वाटले, घरी जायचा प्रश्न मिटला होता. "गोपीकाका मस्त ठेवला टांगा, अगदी अगदी नव्या सारखा, अन हा टोनी पण तसाच आहे ना, वा टोनी म्हणजे गोपुचा घोडा. पांढराशुभ्र, सुलक्षणी, गोपी त्याची बडदास्त पण मन लाऊन ठेवायचा. रोज चण्याचा तोबरा व हिरवा चारा त्याला चारायचा रोज खरारा करायचा. एकदाही चाबूक साधा उगारलाही नाही त्याच्यावर. "गोपीकाका तुम्ही कसे मला घ्यायला

आलांत" प्रथमेश ने पुन्हा विचारलेच. ¡ 'शेजारच्या गावी गेलो होतो वेळ झाला परतण्याला.' गोपीकाका उत्तरले. गोपीकाका चार वर्षे प्रथमेश ला ह्याच टांग्यातुन शाळेत नेत व घरी आणत. प्रथमेशची व गोपीकाकांची गाढ मैत्री झाली होती. गोपीकाका प्रथमेश ला छोटेबाबूजी म्हणत, प्रथमेश ही त्यांना गोपीकाका म्हणत. त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. गोपीकाका घेण्यासाठी आले म्हंटल्यावर प्रथमेश निर्धास्तपणे, मजेत टांग्यात बसुन गोपीकाकांसी गप्पा मारत, आठवणीतले किस्से एकमेकांना सांगत घराकडे धावत होते. घरासमोर टांगा उभा राहिला. गोपीकाकांनी बॅगा वाड्याच्या दिंडीदरवाज्या जवळ आणुन ठेवल्या, व टोनी ला पाणी दाखविणे गरजेचे आहे, असे म्हणून प्रथमेशचा निरोप घेऊ लागले. प्रथमेशने बॅगेतून गोपीकाकां साठीच आणलेली शाल गोपीकाकांना आदराने पांघरली. डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु घेउन ते टांगाघेउन गेले. टांगा दिसेनासा होईपर्यंत प्रथमेश बघतच होता. सकाळच पावणेचार वाजले होते. प्रथमेशने वाड्याच्या दरवाज्याची कडी वाजविली. माध्याने दार उघडले, पाठोपाठच आजोबा आले. अरे वा प्रथमेश आला ते सर्वांना ओरडुन सांगणार तोच प्रथमेशने त्यांना थांबविले. "आता मी झोपणार आहे, सर्व जागे झाले तर माझी झोप होणार नाही दोन दिवस जागरण झालंय, उध्या सकाळी भेटु सर्वांना, तुम्ही ही झोपा." आजोबा व माध्या झोपवायला नीघुन गेले. प्रथमेश ही आपल्या रुमवर झोपण्यासाठी गेला.

सकाळी आठ वाजतां सर्व कुटुंबीय रोजच्या प्रमाणे चहा साठी एकत्र जमुन जेवनाचे टेबलाभोवती बसुन गप्पा मारत होते, त्यांच्या आवाजाने प्रथमेश ला जाग आली, तो उठुन आवरुन सर्व कुटुंबीय जमले होते तेथे गेला. त्याला पाहुन सर्व च आश्चर्याने बघतच राहिले. "अरे तु कधी आलास? कळविले नाहीस, कसा आला. सर्व ठिक आहे ना. प्रश्नांचा नुसता भडीमार, सर्वांच्या प्रश्नांना प्रथमेश शांत पणे उत्तर देत होता. सर्वांना त्याचे हे सरप्राईज फारच आवडले. इंदु शिंधु बंड्या, गोट्या तर त्याला कधिच येऊन बिलगली होती. आजोबांनी गोड शि-या ची आर्डर दिली.सर्वांच्या गप्पा रंगल्या, प्रवास कसा झाला. कुणासाठी काय काय आणले. इ. इ. विषय झाले. बाबांनी विचारले रात्री कीती वाजतां आली गाडी? प्रथमेशने सांगितले "रात्री पावनेतिन तिन ला, नाना काकांनी विचारले, 'मग स्टेशन वरुन कसा काय आला वाड्यावर?'" टांग्याने" प्रथमेश उत्तरला, 'इतक्या रात्री टांगा मिळाला'? आत्याबाई ने विचारले," हो हो, गोपीकांकाचा टांगा स्टेशन मार्गे येत होता त्यांनी तर मला सोडले वाड्यावर "काय " सर्वांचे आवाज टिपेला पोहचलेले प्रथमच ऐकत होता प्रथमेश, सारेच आश्चर्याने व डोळे विस्फारून बघत होते प्रथमेश कडे. आजोबा प्रथम भानावर आले," प्रथमेशा तु गोपीकांका च्या टांग्यातुन स्टेशन ते वाडा आलास?" त्यांनी घोग-या आवाजांत विचारले.. हो ना आजोबा, आम्ही दोघांनी खुप छान गप्पा मारल्या. जुण्या आठवणी काढल्या, त्यांच्या साठी आणलेली शाल मी माझ्या हाताने त्यांना पांघरली. "अध्याप ही कुटुंबीयांचे चेहेरे पडलेले, विस्फारून गेलेले दिसत होते. "तुम्ही सर्व माझ्याकडे असे का बघता आहांत व असे प्रश्न कां विचारता आहात, काय झालं,?" प्रथमेशने वैतागून विचारले." प्रथमेश ऐक "नानाकाका गंभीर होत काप-या आवाजांत म्हणाले" गोपीकांका नो मोअर लाईव्ह हिअर, ते चार महीण्यापुर्वीच टांगा व ट्रक च्या आपघातांत गेले . टोनी सुध्दा गेला, टांगा पलटी झाला होता. टांगा पार मोडला. नशीब टांग्यात कोणी नव्हते. प्रथमेशला आपण काय ऐकतो आहे हे क्षणभर कळेच ना, हे कसं शक्य आहे, कालच तर रात्री गोपीकाकांच्या टांग्यातुन आलो मी वाड्यवर. तो मटकन खाली बसला. घरातील सारं वातावरण बदलुन गेलं. काहिसी भिती, दुखः, आश्चर्य सर्वत्र दाटले. कोणी कोणासी बोलेना. आजी भानावर आली तशी तीने मिठ मोह-या घेऊन प्रथमेशची दृष्ट काढली. बाबा, नानाकाका, आजोबा एकत्र येऊन या घटणे बदल गंभीर पणे चर्चा करू लागले. प्रथमेश थोडा भानावर आला. त्याचा भुताखेतांवर अजिबांत विश्र्वास नव्हता. पण रात्रीच्या घोषणेमुळे तो पार हदरुन गेला होता नक्की. "खरंच का गोपीकाकां टांगाघेउन आपल्या साठी आले होते स्टेशन ला.. पण ते तर या जगांत नाहीत. मग ते मला तर दिसले,

टांगा, घोड्या सुध्दा हे कसे "प्रथमेश च्या डोक्यांत हे प्रश्न थैमान घालु लागले. प्रथमेशने मनासी कांहितरी निश्चित केले, आजोबा, नानाकाका, बाबा यांच्याशी बोलण केलं, गोपीकाकांच्या घरी जाऊन काकुला भेटायचेच, प्रथमेश चा ठाम निश्चय पाहुन सर्वानी प्रथमेशच म्हणणं कबुल केले. ते चौघे, माध्या व आत्याबाई सर्व मिळुन गोपीकाकांच्या घरी सर्व पोहचले. तसं गोपीकाकांच घर लहाणंसच होते, प्रथमेश कधी मधी त्यांच्या बरोबर तेथे जात असे. काकी त्याला दही पोहे खायला न्यायची तो आवडीने खायचा. काकीने प्रथमेश ला बघुन हंबरडा फोडला. "प्रथम तुझी फार फार आठवण काढली होती रे तुझ्या गोपीकाकां ने, फार इच्छा होती तुला भेटायची. प्रथमेश ला दहीपोहे दे म्हणाले जातांना" हुंदके देत काकी म्हणाल्या. स्वतः ला सावरत उठुन प्रथमेश साठी दही पोहे केले. प्रथमेश च्या घशाखाली घास उतरेणा, पण घरांत लावलेला गोपीकाकांचा फोटोबघुन व त्यांची शेवटची इच्छा ऐकुन प्रथमेशने दही पोहे संपविले. मंडळी काकीचा नारोप घेऊन निघाली, बाहेर टोनीच्या तबल दार उघडेच होते. सर्व मंडळी प्रथमेशच्या बरोबर आंत शिरली. आंत दोन्ही चाकं मोडुन पडलेला टांगा धुळ खात पडलेला होता. पुन्हा कधीही दुरुस्त न होण्यासाठी पडुन होता. एक नवीन कोरी करकरीत शाल गोपीकाकांच्या सिटवर पडलेली होती. मंडळींनी सुचक नजरेने प्रथमेश कडे पहात तबेला सोडून वाड्याची वाट धरली.

# कविता

## श्रीकृष्ण

- भास्कर पवार



# एक प्रेरणादायी चरित्र...

**विष्णू आश्रू काळे**

- सुनील दौलत खोडके

सुखादु:खाला छातीशी कवटाळून
आपण आपली वाट
चोखंदळ चाललो की,
भोवतालात उमटते स्वतःचं कायम प्रतिबिंब...

विष्णू आश्रू काळे...
जेमतेम सत्तरच्या आसपास वय असलेलं हे व्यक्तिमत्त्व
परिस्थिती अंत्यत साधारण
पत्नी, दोन मुले, सुना नातवंडे
अशा अल्प परिवाराची धुरा सांभाळत
भविष्याकडे होणारा त्यांचा सुखकर प्रवास पाहिला की,
माझ्या अबोल मुक्या ओठांवर
तरळतात कौतुकाचे
गोड शब्द...

लिहिता वाचता येण्यापुरते शिक्षण
पण एखाद्या उच्चशिक्षित माणसाला लाजवेल
एवढे व्यवहारिक ज्ञान...

कष्ट करण्याची जय्यत तयारी
हे आणखी एक विशेष...

जातीने पारंपरिक रीति रिवाज त्यांच्यावर लादले असले
तरी
जात हा संकुचित निकष
लागू पडत नाही त्यांना,
कारण आदर्शवत व्यक्तिमत्त्वाला करता येत नाही
जातीच्या चौकटीत उभे...
त्यांच्या शिरोपेचात केवळ सन्मानाचा मुकूट शोभे...

# आवाहन ( पुढचे लिखाण )

नमस्कार मंडळी,

न्यू इंग्लंड मराठी मंडळ आपल्या विविध उपक्रमांद्वारे आपल्या सभासदांशी सातत्याने संवाद साधत असते. हाच संवाद 'अनुबंध' या मासिकाद्यारे द्विगुणित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहे. त्यासाठी लागणार आहे तुमची साथ.

आपल्या अनुबंध साठी तुम्ही आमच्याकडे पाठवायचे आहे तुम्ही लिहिलेल्या कथा,ललित लेख, केलेल्या कविता, वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण,भेट दिलेल्या एखाद्या ठिकाणचे वर्णन, आठवण किंवा तुमच्या कॅमेरातुन काढलेली काही क्षणचित्रे,आपल्याला आवडलेला खाद्यपदार्थ आणि त्याची पाककृती , कला दालन या सदरात अपेक्षित आहे तुम्ही काढलेली हस्त-चित्रे, व्यंगचित्र, शब्दकोडी आणि अजुन बरेच काही तुम्ही लिहिलेले साहित्य .... . तसेच आपल्या छोट्या दोस्तांनी लिहिल्या गोष्टी, कविता, काढलेली चित्रे, हस्त-कलेचे, lego पासून बनवलेल्या creation ची क्षणचित्रे....

साहित्य पाठवण्यासाठी ई-मेल - registration@nemm.org

नियम :

- आपल्या लिखाणास वयोमर्यादेचे बंधन नाही. (लहानांपासून आजी आजोबांपर्यंत कोणीही लिहू शकते!)
- तुमचे साहित्य मराठी किंवा इंग्लिश भाषेमध्ये .doc फाईल मध्ये पाठवायचे आहे.
- आपले लिखाण जर कथा, प्रवासवर्णन या प्रकारात मोडत असेल तर शब्द मर्यादा १२००, माहिती स्वरूपातील लेख साधारण शब्द मर्यादा ४५० इतकी असावी.
- आपले साहित्य लेखाचा विषय नोंद करा.
- उचित व दर्जेदार लेखनास/साहित्यास प्राधान्य देण्यात येईल.
- साहित्य व लिखाण मिळाल्यावर पोच ई-मेलने दिली जाईल.
- फोटो, कलाकृती, जाहिरात Jpeg format मध्ये पाठवावे.
- 'अनुबंध' बद्दल आपला अभिप्राय registration@nemm.org या ई-मेल आयडी वर जरूर कळवा.